" पक्षाघात" झालेल्या खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांना लागू असलेल्या रजाविषयक सवलती लागू करणे...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
क्रमांक- एसएसएन-२६९२/[२६] माशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ५ जानेवारी, १९९३.

शासन निर्णय :- 'महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१, नियम ७९, परिशिष्ट तीन मधील तरतुदीनुसार "पक्षाघात" झालेल्या शासकीय कर्मचा-यांना मिळणा-या रजा व आर्थिक सहाय्य-विषयक सवलती राज्यातील अशासकीय शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात शासन आता असे आदेश देत आहे की, राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालये यामधील " पक्षाघात" झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना, " पक्षाघात" झालेल्या राज्यातील शासकीय कर्मचा-यांना सध्या अनुज्ञेय असलेल्या व पुढे भविष्यात अनुज्ञेय होणा-या सवलती लागू करण्यात याव्यात.

२. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती] नियमावली, १९८१ नियम २७ मध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती केल्याचे समजण्यात यावे.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १७८५/९२/व्यय-५, दि. १०-१२-१९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संगणक संकेतांक
२००८०४०६१३४०३४००१

[ रा. म. सुर्यवंशी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालक[ उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक/सर्व विभागीय तंत्रशिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी[प्राथमिक/माध्यमिक]·

शिक्षण निरीक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम, मुंबई.

सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक [ शिक्षण विभाग]

महालेखापाल-१ व २[ लेखा परीक्षा] मुंबई/नागपूर

महालेखापाल-१ व २ [ लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

मुंबई लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, नवी मुंबई.

संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व जिल्हयाचे कोषागार अधिकारी

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, , मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद

वित्त विभाग/नगरविकास विभाग/ग्राम विकास विभाग/

आदिवासी विकास विभाग/ उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग

शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.

निवड नस्ती, माशि-२